Downloaded From: http://iasexamportal.com

CS (Main) Exam:2015

**C-AVZ-O-NBSC**

# MARATHI

**( COMPULSORY )**

*Time Allowed : **Three Hours***

*Maximum Marks : **300***

---

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*All questions are to be attempted.*

*The number of marks carried by a question / part is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI (Marathi Script)** unless otherwise directed in the question.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.*

*Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

---

**Q1.** **खालीलपैकी कोणत्याहि एका विषयावर 600 शब्दांत निबंध लिहा :** ***100***

(a) तरुणांमध्ये वाढती असहिष्णुता

(b) अपयश ही यशाची पायरी आहे

(c) वाचन-संस्कृतीचा होत चाललेला लोप

(d) अंधश्रद्धा निर्मूलन



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

**Q2. खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. उत्तरे संक्षिप्त, सुस्पष्ट व बरोबर असावीत.** *12×5=60*

एका अहवालाप्रमाणे भारतातील महाविद्यालयातून बाहेर पडणारे 80% विद्यार्थी रोजगार प्राप्तिसाठी अपात्र ठरतात. मात्र तरुण पीढीच्या सतत संपर्कात असणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला या अहवालातील आकडेवारी पटत नाही. तरुणांच्या सतत संपर्कात असल्यामुळे एवढे मात्र सांगू शकतो की 90% तरुण रोजगार प्राप्तिसाठी अपात्र ठरतात कारण ते बेजवाबदार आणि उथळ असतात. काळाच्या ओघात, धीटपणा येण्यासाठी तरुण पीढीने चुकीच्या मार्गांची निवड़ करण्यास सुरुवात केली आहे. त्यांना फारसे काही न करता फक्त बक्कळ पैसा मिळवायचा आहे.

याचा अर्थ ते अगदी निरुपयोगी आहेत असे नाही. आता तर ते सफाईदारपणे इंग्रजी बोलतात आणि त्यांच्यातला आत्मविश्वासही वाढीस लागला आहे. त्यांना नवीन रिंगटोन्स, चित्रपट आणि चुटके यांच्याबद्दलची अद्ययावत माहिती आहे. पण या पुढे जाऊन थोडा विचार करतो तेव्हां मला असे जाणवते की त्यांची दृष्टी निष्प्रभ होत चालली आहे. त्यांना भरपूर पैसा मिळवायचा आहे. प्रसार माध्यमांचा वाढता व्याप आणि त्यातून प्रसिद्ध होणारे वेतनवाढीचे अहवाल यामुळे त्यांना तसे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु त्यांना हवा असलेला पैसा प्राप्त करण्यासाठी लागणारे कौशल्य मात्र त्यांच्याकडे नाही. त्यांच्या पदवीकडे संदिग्धतेने बघितले जाते कारण, ते त्यांच्या पदवीपातळी वरील प्रश्नांची उत्तरे देताना अडखळतात. अवांतर वाचन ते फारसे करीत नाहीत. याशिवायही त्यांचे अनेक प्रश्न आहेत. वर्तन आणि नीतिमत्तेचे प्रश्न, स्वतःच्या क्षमतेची जाणीव, रिकामा वेळ कसा घालवावा ? इत्यादि. मला ही मुले-मुली संभ्रमित वाटतात. त्यांच्या प्रश्नांना मी काय उत्तरे द्यावीत ? असा प्रश्न पडतो.

त्यांना हे सांगणे की त्यांनी त्यांच्या आयुष्या बद्दल मला सांगावे योग्य वाटत नाही. त्यांना फक्त तयार उत्तरे आणि उपाय अपेक्षित आहेत, जेणे करून त्यांना ताबडतोब यश प्राप्त होईल. ते म्हणतात "मी योग्य आणि गंभीरपणे प्रयत्न केल्यास मी हवे ते प्राप्त करेन." आणि लगेचच झपाटल्या प्रमाणे वाचन करतात; वाचक होतात, गिटारवादक होतात, फलंदाज होतात किंवा अभिनेते होतात. मला नाही वाटत कोणीही मुलाखत घेणारा त्यांच्या या अपुऱ्या प्रयत्नांची दखल घेईल.

भारताच्या प्रगती बरोबरच आपण एक अशी पीढी निर्माण केली आहे, जिला फारसे काहीही न करता सुखासीन जीवन जगायचे आहे. असे वाटते की आपण दृष्टीहीन, बेजवाबदार आणि नीतिमत्ता नसलेली पीढी निर्माण केली आहे. काही-तरी अर्थपूर्ण कृती करणे आणि स्वतःच्या अंगाला काहीही न लावून घेणे यापैकी एक पर्याय दिल्यास बहुतांश तरुणांमध्ये स्वतःच्या अंगाला काहीही न लावून घेण्याचीच वृत्ती दिसते. तरुण वयात आपल्यात निश्चितच काही आदर्श असायला पाहिजेत. तुमच्या



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

कल्पना मवाळ असल्या तरी, एखाद्या मुद्यासाठी लढण्यास तुम्ही सज्ज असले पाहिजेत. अलिकडे तरुणांमध्ये एखाद्या मुद्यावर लढण्यासाठी लागणारी जिद्द जिद्द दिसत नाही. या तरुणांची घोटीव उत्तरे ऐकून मला समजले आहे की 'पैसा' हा नवीन 'मंत्र' आहे. अर्थपूर्ण कृतीचा पुरस्कार करणारी व्यक्ती ही मागे पडत चालली आहे.

(a) तरुणांच्या रोजगार प्राप्तीसाठीच्या अपात्रतेची कारणे कोणती ? *12*

(b) आजच्या तरुणांना लेखकाकडून कोणत्या अपेक्षा आहेत ? *12*

(c) लेखकाच्या मते आजच्या पीढीची कोणती उद्दिष्टे आहेत ? *12*

(d) आजच्या पीढीने कोणता 'मंत्र' स्वीकारला आहे ? *12*

(e) आदर्शवादाच्या बाबतीत आजच्या तरुणांचे काय धोरण आहे ? *12*

**Q3. पुढील उताऱ्याचे अंदाजे एक तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला कृपया शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा.** *60*

आर्थिक आणि लश्करी दृष्टीने महत्वपूर्ण बाबतीत परकीय राष्ट्रांची पराधीनतेतून मुक्ति होणे हा पर्याय नसून आजच्या काळाची गरज आहे. शासनाने यापूर्वी तोफखाने निर्माण करणारे कारखाने आणि सार्वजनिक उद्योगांच्या माध्यमातून लश्करी दळाच्या गरजा पूर्ण करण्याचे उपक्रम राबविले आहेत. असे असले तरी संरक्षण क्षेत्रात लागणारी विविध साधने निर्माण करण्यासाठी खाजगी कंपन्यांची 'क्षमता आणि कौशल्य' याचा व्याप वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. 'मेक इन इंडिया' हे एक नवीन धोरण स्वीकारण्यात येत आहे. जेणेकरुन घरगुती पातळीवर वेगवेगळ्या साधनांची निर्मिती करता येईल. इतर कोणत्याहि क्षेत्रात लागणाऱ्या साधनांच्या तुलनेत, संरक्षण क्षेत्रात लागणाऱ्या साधनांची गरज अधिक असल्यामुळे घरगुती पातळीवर साधनांच्या निर्मितीमुळे एकतर विदेशी चलनाची बचत होईल आणि देशाच्या सुरक्षेची उत्तम काळजी घेतली जाईल.

संरक्षण क्षेत्रातील साधनांचा वापर फक्त शासकीय यंत्रणेकडून केला जात असल्यामुळे 'मेक इन इंडिया' चे धोरण या क्षेत्रात शासनाने राबविले आहे. घरगुती पातळीवर संरक्षण साधनांच्या निर्मितीची भूमिका आपल्या 'संरक्षण धोरणात' ही दिसून येते. या धोरणात 'भारतात निर्माण' झालेले विकत घेणे आणि 'भारतात तयार करणे नि घेणे' या भूमिकेला अग्रक्रम देण्यात आला आहे. पुढच्या काळात 'आयात करणे' हा अभावाने स्वीकारण्यात येणारा पर्याय असेल. आणि हवी ती यंत्रणा विकसित आणि तयार करण्यासाठी भारतीय कंपन्यांना अग्रक्रम देण्यात येईल. आज भारतीय कंपन्यांकडे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ही क्षमता नसल्यामुळे त्यांना परकीय कंपन्यांच्या सहकार्याने तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण करण्यासाठी उत्तेजन दिले जात आहे.



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

आत्तापर्यंत संरक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या घरगुती उद्योजकां समोर परवाना पद्धत, एफ.डी.आय. धोरणाचे निर्बंध असे अनेक अडथळे होते. संरक्षण क्षेत्रात उत्पादन करण्यासाठी धोरणात्मक पातळीवर अनेक बदल करण्यात येत आहेत. त्यामुळे घरगुती उद्योजकांना या क्षेत्रात प्रवेश घेणे सोपे जाईल. सर्वात महत्वाचे म्हणजे संरक्षण क्षेत्रात परकीय गुंतवणूक वाढविण्यासाठी एफ.डी.आय. धोरणात उदार भूमिका घेतली जात असल्यामुळे बहुतांश साधन-सामग्री, कच्चा माल, चाचणी यंत्रे, उत्पादन यंत्रे इत्यादींना आता परवानामुक्त करण्यात येत आहे. अशा प्रकारची साधने तयार करण्यास उत्सुक कंपन्यांना आता औद्योगिक परवाना घेण्याची गरज नसेल.

घरगुती आणि परकीय भांडवलदारांना आता संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करण्याची उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. एकीकडे शासन परवाना, एफ.डी.आय. गुंतवणूक यासारख्या धोरणांमध्ये आवश्यक ते बदल करीत आहे. तर दुसरीकडे उद्योगांनीही भांडवल आणि यंत्रणेची गुणवत्ता अद्ययावत करण्यासाठीचे आव्हान स्वीकारले पाहिजे. संरक्षण हे एक असे क्षेत्र आहे ज्यात मोठी गुंतवणूक, तंत्रज्ञान याची गरज असते. त्यामुळे या क्षेत्रातील कंपन्यांनीही तात्पुरता फायदा मिळविण्याऐवजी दीर्घकालीन दृष्टी ठेवणे गरजेचे आहे. आपणास 'संशोधन आणि विकास' व अद्वितीय उत्पादन क्षमतेवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्यांसाठी एकसारखे कार्यक्षेत्र उपलब्ध करून देण्यासाठी योग्य धोरणांची आणि वातावरणाची निर्मिती होणे, नितांत गरजेचे आहे.

*(372 शब्द)*

**Q4. पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा.** ***20***

अफ्रीकेच्या मोठ्या भूप्रदेशात वाळवंट आहे. इथे फक्त नि फक्त वाळू आणि खडक आहेत वाळू तर इतकी गरम असते की तुम्ही दिवसा या वाळूवर अनवाणी चालूच नाही शकत. या वाळवंटात इथं तिथं जमिनीत खूप खोलवर पाण्याचे झरे आहेत. इतके खोलवर की सूर्यप्रकाश तिथे पोचत नाही आणि पाण्याचे वाष्पीकरण होत नाही. हे झरे फार कमी आणि खूप लांबवर असतात. पण जिथे-जिथे हे झरे आहेत तिथे तिथे उंचच उंच आणि सुंदर झाडे उगवली आहेत. त्यामुळे हिरवेगार, थंड आणि छायादार असे सुंदर वातावरण या झऱ्यांच्या भोवती तयार झाले आहे. अशा परिसराला 'ओएसिस' असे म्हणतात.

अरब मुलुखातील जी प्रजा शहरात राहत नाही ती वर्षभर वाळवंटातील या परिसरात राहते. ही माणसे सहजपणे हाताळता आणि हव्या त्या ठिकाणी नेता येण्यासारख्या तंबूत राहतात. जेणे करून त्यांना एका 'ओएसिस' वरून दुसऱ्या 'ओएसिस' वर जाता येते व त्यांच्याकडे असलेल्या मेंढ्या, उंट, घोडा इत्यादींना चारा-पाणी उपलब्ध होते. वाळवंटातील हे अरब गोड अंजीर तर खातातच शिवाय ताडाच्या झाडावरील खजुराला वाळवून वर्षभर त्याचा उपयोग करतात. या अरबांकडे जगातील सर्वोत्तम घोडे आहेत. अरब माणसाला घोड्याच्या स्वारीचा अत्यंत अभिमान आहे. तो जितका



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

आपल्या बायको मुलांवर प्रेम करतो, तितकेच प्रेम घोड्यावरही करतो. आकाराने मोठा असला तरी उंट हा सुंदर घोड्यापेक्षा अधिक उपयोगी ठरतो. दोन किंवा त्याहीपेक्षा जास्त घोड्यांच्या वाहून नेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त सामान उंट उचलतो. अरब उंटावर सामान लादतात नि स्वतःही स्वार होतात. आणि वाळवंटात लांबपर्यंत फिरतात. कदाचित म्हणूनच त्याला 'वाळवंटातले जहाज' म्हणत असावे.

**Q5. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** ***20***

Language and communication are something that children learn by talking to one another. But schools consider this an act of indiscipline. Instead, we have a special grammar class to learn language ! One educationist remarked, 'It is nice that children spend just a few hours at school. If they spend all 24 hours in schools, they will turn out to be dumb !' In most schools, teachers talk, children listen. The same is true for other skills also. Children learn a great deal without being taught, by tinkering and pottering on their own.

Changes in the school system, if they are to be of lasting significance, must spring from the actions of teachers in their classrooms, teachers who are able to help children collectively. New programmes, new materials and even basic changes in organisational structure will not necessarily bring about healthy growth. A dynamic and vital atmosphere can develop when teachers are given the freedom and support to innovate. One must depend ultimately upon the initiative and respectfulness of such teachers and this cannot be promoted by prescribing continuously and in detail what is to be done.

In education we can cry too much about money. Sure, we could use more, but some of the best classrooms and schools I have seen or heard of, spend far less per pupil than the average in our schools today. We often don't spend well what money we have. We waste large sums on fancy buildings, unproductive administrative staff, on diagnostic and remedial specialists, on expensive equipment that is either not needed, or underused or badly misused, on tons of identical and dull textbooks, readers and workbooks, and now on latest devices like computers. For much less than what we do spend, we could make our classrooms into far better learning environments than most of them are today.



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

**Q6.** **(a)** **पुढील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा.** ***2×5=10***

(i) नावडतीचं मीठ अळणी

(ii) तोंडाला पाने पुसणे

(iii) काखेत कळसा गावाला वळसा

(iv) कानाआड करणे

(v) घर डोक्यावर घेणे

**(b)** **खाली दिलेल्या कल्पनांचा 10 वाक्यात विस्तार करा.** ***5×2=10***

(i) जया अंगी मोठपण तया यातना कठीण

(ii) अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।
तया ज्ञान हे अन्नपोटी जिरेना ।।

**(c)** **पुढील विषयावर 20 वाक्यांचा संवाद लिहा.** ***10***

स्वच्छ भारत मोहीम

**(d)** **खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** ***1×5=5***

(i) अहंकार

(ii) भूमि

(iii) प्रशंसा

(iv) थंड

(v) लहान

**(e)** **पुढील वाक्यांना भूतकाळात लिहा.** ***1×5=5***

(i) सदाशिव पेनात शाई भरतो आणि कंपासपेटीत ठेवतो.

(ii) मांजर दबा धरुन बसणार आणि उंदीर दिसताच झडप घालणार.

(iii) विद्यार्थ्यांनै सगळी प्रश्नपत्रिका वाचावी आणि मग उत्तरे लिहावी.

(iv) सिद्धार्थ डी.व्ही.डी. घेतो आणि प्लेअरमध्ये टाकतो.

(v) कालिंदी सतरा नंबरची बस पकडत असते आणि खिडकीपाशी बसत असते.



Downloaded From: http://iasexamportal.com




## What you will get:


- 100% G.S. Syllabus Covered
- 8+ Booklets
- More Than 2500+ Pages
- Guidance & Support from Our Experts

## Our Objectives:

- Firstly to cover 100% civil service Mains examination (IAS) syllabus.
- Secondly to compile all the required study materials in a single place, So to save the precious time of the aspirants.

**For More Information Click below Link**

http://iasexamportal.com/civilservices/study-kit/gs-mains





# General Studies Test Series for IAS Mains Examination

## What you will get:

- **Login id & Password for online discussion**
- **Question Papers ( 12 Mock Tests : PDF File )**
- **Evaluated Answer Booklet by experts with proper feedback, comments & guidance.**
- **Answer format ( Synopsis ) of Mock Test paper**
- **Comprehensive analysis of previous year questions &**
- **Mode of Discussion: Email ,Telephonic and Online Discussion**
- **Value Addition material like**
    - **a. Current General Studies Magazine**
    - **b. Solved papers of General Studies Mains 2013**
    - **c. Categorised question papers of last ten years of General Studies Mains Exam**
    - **d. Trend Analysis**

## For More Information Click below Link

http://iasexamportal.com/civilservices/test-series/ias-mains-gs




---

# Online Coaching for IAS Mains General Studies I, II, III & IV (Combo)

---

## What you will Get (?)

- **General Studies (Paper – I, II, III & IV) Online 100 % Reading Material of the Syllabus (Which can be saved easily)**
- **Slides (For Giving Summary of Each Topics)**
- **Categorized Unit and Sub-Unit Wise Question Papers of General Studies**
- **Current General Studies Magazine (Indispensable Magazine for General Studies)**
- **Daily Answer Writing Challenge for IAS Mains Contemporary Issues**
- **It is full of tips on areas of emphasis, caution while reading and writing , how to write the answer (?) .**
- **Model Test Question Paper for General Studies - I, II, III and IV for Mains Exam**

- **Online and Telephonic interaction with the course director, and continuous evaluation through a regular online writing session in every chapter and topic.**

## For More Information Click below Link

http://iasexamportal.com/civilservices/courses/ias-mains-gs-combo